**कृपया प्रसिध्दीसाठी -** **16 मार्च 2009**

## उत्तर मुंबईत भाजपाने निवडणुकीचे रणशिंग फुंकले.

### *वैंकय्या नायडू यांच्या उपस्थितीत भव्य महासंमेलन संपन्न*

**मुंबई, सोमवार :** भारतीय जनता पार्टीच्या हजारो कार्यकर्त्यांसमोर लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकत राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री.वैंकय्या नायडू म्हणाले, "काँग्रेस का हाथ गरीबों के साथ ही वर्षांनुवर्षांची घोषणा ऐकून जनता विटली आहे. प्रत्यक्षात सर्व आघाड्यांवर निष्फळ ठरलेल्या काँग्रेस पुढे मतदारांना तोंड कसे दाखवायचे असा प्रश्न आहे. समजदार मतदारही जाणतात की श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारच्या काळातच वस्तूंच्या किंमती नियंत्रणाखाली होत्या आणि काँग्रेसच्या काळात आता महागाई गगनाला भिडली आहे. तुम्ही आत्मविश्वासाने मतदारांकडे जा. मतदार भाजपाचीच साथ देतील" उत्तर मुंबई भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांचे व हितचिंतकांचे काल बोरिवलीत महासंमेलन भरले होते त्यावेळी श्री. नायडू बोलत होते.

उत्तर मुंबईचे खासदार श्री. गोविंदा यांच्या बाबत बोलताना श्री. व्यंकैया नायडू म्हणाले,"तुमचा खासदार गोविंदा आहे कुठे? ना इथे दिसत ना संसदेत. आणि तुमचे पूर्वीचे खासदार राम नाईक मात्र काम करतातच आहेत आणि करतच राहतील." महासंमेलनाला हजारोंच्या संख्येत आलेले कार्यकर्ते बघून श्री. नायडू उत्साहात म्हणाले,"हे कार्यकर्त्यांचे महासंमेलन न वाटता निवडणुकीची विजय सभाच वाटते आहे. "

सदर महासंमेलनात बोलताना माजी केंद्रिय मंत्री श्री. राम नाईक म्हणाले," आज देशापुढे महागाई हीच सर्वात मोठी समस्या आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती, पेट्रोल, डिझेलच्या किंमती गगनाला भिडलेल्या आहेत. गॅसचा काळाबाजार सुरु आहे. रॉकेलही शिधावाटप दुकानात मिळेनासे झाले आहे. रेल्वे मंत्री श्री. लालू प्रसाद यांनी उपनगरी प्रवाशांची उपेक्षा सुरुच ठेवली आहे. आता हालअपेष्टा भोगायला लावणा-या सरकारला धडा शिकवायची वेळ आली आहे. "

या संमेलनाला अतिथि म्हणून उपस्थित असलेले शिवसेनेचे उपनेते श्री. विनोद घोसाळकर म्हणाले,"गेली 22 वर्षे भाजपा शिवसेनेची युती अभेद्य आहे यापुढेही ती तशीच राहील. आम्ही सारेच श्री. लालकृष्ण अडवाणी यांच्याकडे भावी पंतप्रधान म्हणून बघत आहोत." या संमेलनामध्ये बंजारा समुदायाच्या लोकांनी तसेच चार वर्षांपूर्वी विधानसभा निवडणुकीच्या वेळेला भाजप सोडून राष्ट्रवादीत गेलेल्या कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा भाजपात प्रवेश केला. सदर संमेलनाला शेकडो अल्पसंख्यक ही उपस्थित होते. या सर्वांचे स्वागत करताना भाजपा मुंबईचे अध्यक्ष श्री. गोपाळ शेट्टी म्हणाले," गेली 60 वर्षे काँग्रेसची पोकळ आश्वासने ऐकून अप्लसंख्यक विटले आहेत. आता त्यांची नाळ भाजपशी जोडली गेली आहे.

सर्वश्री भाई गिरकर, मधु चव्हाण , योगेश सागर, श्रीमती पारुल महेता आदि नेत्यांचीही यावेळी भाषणे झाली. संमेलन सुरु होण्यापूर्वी श्री. बंजारा यांनी त्यांच्या देशभक्तीपर कवितांचे वाचन केले. श्री. दिलीप पंडित यांनी सभेचे सूत्रसंचालन केले.

**(कार्यालय सचिव)**